Literacy for a Billion

Movie: Nishani Dava Angatha
Year: 2009

Song: Saha Male Saha Female
Lyricist:

सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल

लई बाराचे एक डझन
मेल फिमेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल

बंडू भावडा राठोड
लई शकलीचं गाठोडं
सरस्वतीचा मुखात वास
कमावलेले शब्द मिठास
जे जे शेके अंगावर
घेऊन बसला शिंगावर
जे जे शेके अंगावर
घेऊन बसला शिंगावर
लाथ घालून काढे पाणी
वाळू रगडून काढे तेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल

पन्नाशीचे झुंबडराव
मनात जागा हिरवा गाव
अध्यात्माचे हिरवे शेत
सुकली कणसे हिरवा देश
कधी किर्तनी नई बसला
कधी तमाशा नई चुकला
कधी किर्तनी नई बसला
कधी तमाशा नई चुकला
आत्मा बित्मा निव्वळ शेर
बॉडी सोडून बाकी फेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल

उमर लहानी तरी सवाई
राजपुत हा भला जमाई
उमर लहानी तरी सवाई
राजपुत हा भला जमाई
सर्वांहींची अडे अक्कल
तेथे लढली हा शक्कल
नंतरचे हे दोन बिचारे
जन्मापासून अजून कुंवारे
नवलाखे हा पाच पांडे
मनामधे खातो मांडे
नवलाखे हा पाच पांडे
मनामधे खातो मांडे
अन् हे शिंगरू अती लहान
नाव विठोबा सावळं ध्यान
अन् हे शिंगरू अती लहान
नाव विठोबा सावळं ध्यान
कधी वाटे भोळा आणि
कधी वाटे हा बनेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल
भुयाल बाई बोगदे बाई
गाळ वाहे डोंगरे बाई

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.

दवते बाई पाठक बाई
कमी कुठल्या कामी नाही
भुयाल बाई बोगदे बाई
गाळ वाहे डोंगरे बाई
दवते बाई पाठक बाई
कमी कुठल्या कामी नाही
अशी कथा ही असले किस्से

अस्से बारा मेल फिमेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल
लई बाराचे एक डझन
मेल फिमेल
सहा मेल सहा फिमेल
सहा मेल सहा फिमेल

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*